# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ / श्रावण २०, १९३९ ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७२**

---

## सुपर स्पेशालिटी रुग्णालय, नागपूर येथे मध्यवर्ती चिकित्सालयीन प्रयोगशाळा उभारण्याबाबत

**(१) * ३२७७७ श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक २८७१६ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील सेंट्रल क्लिनिकल लॅबोरेटरीला (मध्यवर्ती चिकित्सालय प्रयोगशाळा) (सीसीएल) प्रशासकीय मान्यता प्राप्त होवूनही निधीची तरतूद करण्यात आली नसल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रयोगशाळेकरीता निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर काम करण्यास शासन निर्णय दिनांक २३/११/२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर कामासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जवळेथर, पाचल, विलये (ता.राजापूर) आणि वरचे टेंभे (ता.जि.रत्नागिरी) येथील रस्ते करण्याबाबत

**(२) * ३१४०६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवळेथर, पाचल, विलये (ता.राजापूर) आणि वरचे टेंभे (ता.जि.रत्नागिरी) येथील रस्ते करण्याच्या मागणीचे निवेदन लोकप्रतिनिधीनी दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. ग्रामविकास मंत्र्याना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीचे स्वरुप काय आहे,
(३) तसेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात २५/१५ या योजनेतून रत्नागिरी जिल्हयाकरिता राज्यातील इतर जिल्हयांपेक्षा कमी निधी मंजूर होऊन तो पूर्ण खर्च झाला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रत्नागिरी जिल्ह्यांमधील गावातील रस्ते करण्यासाठी व २५/१५ योजनेतून प्राप्त झालेल्या अखर्चित निधीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, पाचल गुरववाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (गावांतर्गत) या कामासाठी रुपये ५.०० लक्ष इतका निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये लेखाशीर्ष २५१५१२३८ अंतर्गत मंजूर करण्यात आलेले आहे.

(३) होय, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषद, रत्नागिरीकरीता रुपये ६९३.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी रुपये १३९.०० लक्ष खर्च झाला आहे.

(४) याबाबत, उर्वरीत निधी खर्च करण्यासाठी जिल्हा परिषदेला वित्त विभागाच्या दिनांक ०६/०६/२००८ च्या आदेशान्वये लगतचे आर्थिक वर्ष म्हणजेच दिनांक ३१/०३/२०१८ अखेर मुदत आहे. त्यानुषंगाने अपूर्ण कामे मार्च, २०१८ अखेर पूर्ण करुन सदर निधी खर्च करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील विविध विकास कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३) * ३३१३९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात सिंचन विहीर, गांडुळखत निर्मिती, सिमेंट बंधारे, शेततळे, दगडविचिंग, मजगी आदिसह विविध कामे रोजगार हमी योजनेंतर्गत सुरु असून सन २०१६-१७ वर्षामध्ये शासनाकडून निधी उपलब्ध झाला नसल्याने सदर कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्ह्यातील अकुशल कामाचे नियमित मजुरी अदा करण्यात आलेली आहे. मात्र माहे फेब्रुवारी, २०१७ ते १६ मे, २०१७ पर्यंत कुशल कामाचा निधी उपलब्ध नव्हता. त्यामुळे सन २०१६-१७ वर्षामध्ये बहुतांश कामे भौतिक व आर्थिक बाबीमुळे अपूर्णावस्थेत आहेत.

(२) शासनाचे दिनांक १३ मे, २०१७ पासून कुशल कामाचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे व आजस्थितीस कोणताही अकुशल व कुशल निधी प्रलंबित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग किल्ल्याचे संवर्धन व पर्यटन विकासासाठी मास्टर प्लॅन तयार करण्याचा प्रस्तावाबाबत

**(४) * ३२५५२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमी इतिहासाचा मोठा ठेवा म्हणून ओळखला जाणाऱ्या सिंधुदुर्ग किल्ल्याच्या संवर्धनासाठी तसेच पर्यटन विकासासाठी मास्टर प्लॅन तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किल्ल्यात इतिहासाची माहिती देणारे सुसज्ज पर्यटन केंद्र व दोन नवीन जेटी उभारण्यात येतील असे आश्वासन मा.पर्यटन मंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय. सिंधुदुर्ग किल्ला, मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील पर्यटनाच्या विविध कामांचा रूपये ६३.६१ कोटी रकमेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) अंशत: खरे आहे. सदर प्रस्तावात पदपथ, स्वच्छतागृह, पर्यटन स्वागत केंद्र, बागबगीचा, किल्ल्याच्या तटबंदीचे प्रदीपन, किल्ल्याच्या इतिहासाची माहिती सांगणारा ४ DX Laser Show, सौर ऊर्जेवरील पथदिवे, फ्लोटिंग जेट्टी इत्यादी कामांचा समावेश आहे.
(३) सदर प्रस्ताव रूपये ५ कोटीपेक्षा जास्त किंमतीचा असल्यामुळे त्यास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयातील मेट्रो ब्लड बँक कार्यान्वित करण्याबाबत

**(५) * ३४३८२ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयात कोट्यवधी रुपये खर्च करुन कार्यान्वित करण्यात आलेली मेट्रो ब्लड बँक मागील तीन वर्षांपासून बंद असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मेट्रो ब्लड बँकेला अन्न व औषध प्रशासन विभागाची परवानगी मिळून ब्लड बँक कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, पुणे येथील मेट्रो ब्लड बँक अद्‌याप कार्यान्वित झालेली नाही.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ब्लड बँकेच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाकडे सदर मेट्रो ब्लड बँकेस परवाना मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नीरा-देवघर कालव्याचे (ता.खंडाळा, जि.सातारा) काम पूर्ण करण्याबाबत

**(६) * ३४२०३ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खंडाळा तालुक्यातील (जि.सातारा) २४ गावे सिंचनाखाली यावी यासाठी शासनाने सुरु केलेल्या नीरा-देवघर प्रकल्पाच्या कालव्याचे काम अनेक वर्षापासून संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालव्याच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या २४ गावातील शेती, ग्रामस्थ व जनावरे पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या कालव्याच्या कामाला गती देवून ती तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) निधीच्या उपलब्धतेनुसार कालव्याचे काम करण्यात येत आहे.
(२) निरा-देवघर प्रकल्पाव्दारे, खंडाळा तालुक्यातील एकूण ४९ गावांना कालव्याव्दारे सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. सद्यःस्थितीत कि.मी. २६ ते ६५ या लांबीतील कालव्याव्दारे १९ गावांना लाभ होत असून उर्वरित ३० गावांना लाभ देणे बाकी आहे.
(३) निरा देवघर प्रकल्पासाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण रुपये २०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे व निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाची कामे करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बामणोली (ता.खालापूर, जि.रायगड) धरणांतर्गत जॅकवेल व पाटाची दुरुस्ती करण्याबाबत

**(७) * ३२४६४ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बामणोली (ता.खालापूर, जि.रायगड) धरणांतर्गत जांभिवली येथील जॅकवेल दुरुस्ती व पाट दुरुस्ती न झाल्याने रब्बी हंगामात जांभिवली, सवणे इत्यादी ठिकाणच्या शेतकऱ्यांना दुबार पीक घेता आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जॅकवेल व पाट दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध असतानाही पाटबंधारे विभागाकडून या कामाकडे दुर्लक्ष केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कामे विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे रब्बी हंगामातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त कामे पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) बामणोली प्रकल्पाच्या रब्बी हंगामामध्ये प्रत्येक वर्षी सरासरी ४० हे. क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे.

(२) व (३) प्रकल्पाच्या विमोचकामधून पाण्याची गळती होत असली तरी त्याचा परिणाम शेतीच्या रब्बी मधील सिंचनावर झालेला नाही. शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना रब्बी हंगामामध्ये सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(४) शासन निर्णय क्रमांक : देवदु२०१५/(८३६/२०१५)/सिं.व्य.(कामे), दिनांक १७/११/२०१६ मधील तरतुदीनुसार महामंडळाकडे जमा होणाऱ्या बिगर सिंचन पाणीपट्टीच्या रक्कमेतून सदर दुरुस्तीचे काम करण्याचे प्रस्तावित असून दुरुस्तीचे काम सन २०१७-२०१८ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निंबवली (ता.वाडा, जि.पालघर) येथे गरम पाण्याचे झरे (कुंडे) असल्याने त्यास पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत

**(८) * ३३३१४ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निंबवली (ता.वाडा, जि.पालघर) येथे गरम पाण्याचे झरे (कुंडे) असल्याने देश-विदेशातील पर्यटक येथे येत असतात मात्र सदरहू ठिकाणी काहीच सोयी सुविधा नसल्याने पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कुंडामध्ये गंधकमिश्रीत पाणी असल्याने त्यात आंघोळ केल्याने अनेक रोग, व्याधी बऱ्या होतात, त्यामुळे अनेक रोगबाधित रुग्ण तेथे येत असतात, परंतु सोयी सुविधांच्या कमतरतेमुळे त्यांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता निंबवलीला पर्यटनस्थळाचा दर्जा देवून पाण्याच्या झऱ्याचे सुशोभीकरण करावे अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खर्डी जवळील धामणी तळेखण (ता.शहापूर, जि.ठाणे) गावाला जोडणाऱ्या पत्रीपुलाची दुरूस्ती करण्याबाबत

**(९) * ३२२२८ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी जवळील धामणी तळेखण (ता.शहापूर, जि.ठाणे) गावाला जोडणारा पत्रीपुल हा ४० वर्षापूर्वीचा असून सदर पुलाचे पत्रे गंजून पुल मोडकळीस आला आहे, तसेच पुलाखालील लोखंडी खांब जीर्ण व कमकुवत झाल्याने पुल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक पुल वाहतूकीसाठी बंद केल्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना केवळ अर्धा किमी प्रवासासाठी ९ किमी प्रवास करावा लागत असून त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री ठाणे तसेच, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उप विभाग), शहापूर यांच्याकडे नागरिकांनी मागील २ वर्षापासून निवेदने देवून मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाची दुरूस्ती करून पुल वाहतुकीसाठी सुसज्य ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे. सदर साकव पादचारी साकव म्हणून तयार करण्यात आला होता, तथापि त्यावरुन दुचाकी व चारचाकी वाहनांची वाहतुक सुरु होती.

साकवाचा पत्रा काही भागात तुटलेला असल्याने चारचाकी वाहनांच्या वाहतुकीसाठी सदर साकव बंद करण्यात आलेला आहे. पर्यायी रस्त्याने खर्डी येथे जाण्याकरिता ४/२०० कि.मी. जादाचा प्रवास करावा लागतो.

(३) अशा विषयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) सदर पुलाची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे व या साकवाच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तांबे ते बांबळेवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत

**(१०) * ३३३०९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तांबे ते बांबळेवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) हा रस्ता अत्यंत अरूंद व दुरवस्थेत असल्यामुळे सदर ठिकाणी स्थानिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांना अत्यंत तातडीच्या कामाकरीता बांबळेवाडी ते तांबे असा पायीच प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार तांबे ते बांबळेवाडी या रस्त्याच्या रूंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) तांबे ते बांबळेवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ५५ असून लांबी २.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/४०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाचा असून एस.टी. वाहतुकीस योग्य आहे. त्यापुढील १/४०० ते २/०० कि.मी. पर्यंतचा रस्ता हा माती मुरुमाचा असून अरुंद व खराब आहे.

हा रस्ता सुधारणा करणे कामाचे रक्कम रुपये १६.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करुन एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प घोडेगाव यांच्याकडे जिल्हा परिषदेमार्फत मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील किशोरवयीन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याबाबत

**(११) * ३२७४६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १५ ते २० वर्षे वयोगटातील ६० टक्के मुलींचे किशोर वयात असताना लैंगिक शोषण झाल्याचे निवासी डॉक्टरांच्या “मार्ड” संघटनेने यासंदर्भात “गुड टच अ‍ॅण्ड बॅड टच” हे विशेष अभियान राबवून केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर लैंगिक शोषणाच्या प्रकाराला प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच किशोरवयीन मुला-मुलींची आरोग्य तपासणी करणे व आरोग्य शिक्षण देण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
अशा प्रकारचा कोणताही अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) किशोरवयीन मुलींचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे व आरोग्य, स्वच्छता, पोषण, प्रजनन व लैंगिक आरोग्य, कुटुंब आणि बालकांची काळजी या विषयी किशोरवयीन मुलींमध्ये जाणीव जागृती करणे यासाठी विभागामार्फत सबला योजनेंतर्गत कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाचोड (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील ग्रामीण रुग्णालय प्रयोगशाळेतील तंत्रज्ञाचे रिक्त पद भरण्याबाबत

**(१२) * ३२९८५ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोड (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या प्रयोगशाळेतील तंत्रज्ञ पद दोन वर्षापासून रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थुंकी, लघवी, रक्त, हिमोग्लोबिन आदि विविध तपासण्यांसाठी रुग्णांना खाजगी प्रयोगशाळेत जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर रुग्णालय प्रयोगशाळेतील तंत्रज्ञाचे रिक्त पद भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, प्रयोगशाळा तंत्रज्ञाचे पद रिक्त असताना सर्व सेवा प्रयोगशाळा सहाय्यक यांचेमार्फत देण्यात आल्या असल्याने रुग्णांची गैरसोय झालेली नाही. तसेच सद्य:स्थितीत सार्वत्रिक बदल्या सन २०१७ मध्ये रुग्णालयात प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा सहाय्यक ही दोन्ही पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या कारभारासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याबाबत

**(१३) * ३११६७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २७९८४ ला दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांची जबाबदारी केंद्र शासन स्वीकारण्यास तयार नसल्यामुळे या रुग्णालयांच्या कारभारासाठी शासन स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळाची स्थापना कधी करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील हजारो कामगारांना आरोग्य विषयक सुविधा मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) 'राज्य कामगार अधिनियम (सुधारीत) २०१०' मधील तरतुदीनुसार शासन निर्णय दिनांक २१/६/२०१६ अन्वये राज्यस्तरीय महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) महामंडळ कंपनी कायद्यांतर्गत स्थापन करण्याबाबतचा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सद्य:स्थितीत शासनाद्वारे राज्य कामगार विमा योजना प्रभाविपणे राबविण्यावर भर देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडयांमार्फत कुपोषणग्रस्त मुलांना "रेडी टू इट" पोषण आहार पुरविण्याबाबत

**(१४) * ३११७६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडयांमार्फत कुपोषणग्रस्त मुलांना "रेडी टू इट" या नावाने पोषण आहार पुरविण्याची रुपये १०० कोटी खर्चाची योजना राबविण्याचा प्रस्ताव महिला व बालविकास विभागाच्या विचाराधीन असल्याचे कुपोषित बालकांसाठी काम करणाऱ्या जन आरोग्य व अन्न अधिकार अभियानाने दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कुपोषित बालकांचे आरोग्य सुधारणेसाठी रुपये १८ कोटीचा ताजा आहार करुन देणे उत्तम असल्याचे सदर संस्थेने निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, सदर निर्णयाचे व योजनेचे एकंदर स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यात सुरु असलेल्या अंगणवाडयांमार्फत तीव्र कुपोषित बालकांना (SAM) सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यासाठी Energy Dense Nutritious Food च्या निविदा काढण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, सदर निविदा ही १०० कोटी रुपये किंमतीची नसून अंदाजे रुपये ३८ कोटी इतकी आहे.

(२) जन आरोग्य व अन्न अधिकार अभियान या संस्थेचा कुठलाही प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) बालरोग तज्ञ, आहार तज्ञ व युनिसेफचे प्रतिनिधी यांनी राज्यातील कुपोषित बालकांना Energy Dense Nutritious Food (EDNF) देणेबाबत केलेल्या शिफारशी विचारात घेऊन विभागाने EDNF देण्याचा निर्णय घेतलेला आहे. याअंतर्गत कुपोषित बालकांना प्रतिदिन प्रति लाभार्थी किमान ९२ ग्रॅम वजनाचे EDNF डोस देण्यात येणार आहे. हा डोस वैद्यकीय अधिकारी बालकांचे वजन व वय यानुसार ठरवतील त्या प्रमाणात देण्यात येईल.

(४) ग्राम बाल विकास केंद्र राबविण्यासाठी युनिसेफच्या मदतीने राज्यातील सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) व जिल्हा आरोग्य अधिकारी यांची एक दिवसाची कार्यशाळा घेण्यात येवून प्रकल्पस्तरावर VCDC ची योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मास्टर ट्रेनरचे प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयात अपुऱ्या सोई-सुविधामुळे गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(१५) * ३१४९२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयात अपुऱ्या सोई-सुविधा व स्त्रीरोग तज्ञ नसल्याने आदिवासी गर्भवती माता, बालमृत्यूंचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ईभारपाडा येथील रंजना ठाकरे या ८ महिन्यांच्या गर्भवती महिलेचा रुग्णालयातील गैरसोईमुळे दिनांक २७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महिलेस उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात पाठविताना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आलेली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित महिलेच्या मृत्यूस जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) ईभारपाडा येथील श्रीमती रंजना ठाकरे या ८ महिन्याच्या गर्भवती महिलेचा मृत्यू ग्रामीण रुग्णालय, तलासरी येथे झालेला नसून खाजगी रुग्णालयातून सिल्वासा येथे स्थलांतरीत करताना झाला आहे. सदर रुग्णाचे नातेवाईक स्वेच्छेने तिला स्वत:च्या खाजगी वाहनाने घेऊन गेले असून रुग्णवाहिका मिळण्याबाबत त्यांनी ग्रामीण रुग्णालय, तलासरी यांच्याकडे संपर्क साधलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील अरबी समुद्राकडे वाहून जाणारे पाणी गोदावरी नदीपात्रात वळविण्याबाबत

**(१६) * ३३८७३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील पश्चिम वाहिनी नद्यांचे अरबी समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी १७ प्रवाही वळण योजनांना शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी लागणारा निधी व इतर तांत्रिक बाबी याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) १७ प्रवाही वळण योजना पैकी १४ वळण योजनांना उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावांतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यापैकी २ वळण योजनांचा खर्च तुलनेत जास्त असल्याने उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावातून वगळण्यात आल्या आहेत.

याव्यतिरिक्त २ प्रवाही वळण योजनांना लघु पाटबंधारे तलाव शिरपूंजे व १ प्रवाही वळण योजनेस लघु पाटबंधारे तलाव पाडोशी अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

(२) १७ प्रवाही वळण योजनांची मंजुर प्रशासकीय मान्यता किंमत रूपये १३४.२८ कोटी असून अद्ययावत किंमत रूपये ५२०.३३ कोटी आहे व त्यावर जून, २०१७ अखेर रूपये २६०.५७ कोटी इतका खर्च झालेला आहे व उर्वरित किंमत रूपये २५९.७६ कोटी इतकी आहे.

उर्ध्व गोदावरी प्रकल्पांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रूपये ३८.३४८ कोटी इतक्या रकमेची एकत्रित तरतूद आहे.

राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार व मा.राज्यपाल यांच्या निदेशानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतून सदर योजना पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लिंगदरी व पुसेगाव ग्रामपंचायती अंतर्गत (ता.सेनगांव, जि.हिंगोली) मग्रारोहयोच्या कामात गैरव्यवहार व अनियमितता झाल्याबाबत

**(१७) * ३२६९७ श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिंगदरी व पुसेगाव ग्रामपंचायती अंतर्गत (ता.सेनगांव, जि.हिंगोली) मग्रारोहयोच्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार व अनियमितता झाल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे आयुक्त, नागपूर यांनी अचानक भेट देऊन त्याची तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचे मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) आयुक्त, मनरेगा, नागपूर यांनी मौजे लिंगदरी व मौजे पुसेगाव, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामांना भेट दिली. मौजे लिंगदरी येथील तपासणी दरम्यान योजनेच्या कामांमध्ये प्रशासकीय अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले. उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी मौजे लिंगदरी येथे झालेल्या कामाची तपासणी करून अहवाल सादर केला आहे. तसेच, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी मौजे पुसेगाव येथील माती नाला बांध या कामाची तपासणी करून अहवाल सादर केला.

प्रस्तुत प्रकरणी चौकशीअंती ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत लिंगदरी व संगणक परिचालक, पंचायत समिती, सेनगाव यांना पदावरुन कमी करण्यात आले आहे. ग्रामसेवक, ग्रामपंचायत लिंगदरी यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव, जिल्हा हिंगोली यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. मौजे पुसेगाव येथे वन विभागामार्फत करण्यात आलेल्या कामांसंबंधि दोषी कर्मचारी/अधिकारी यांच्याकडून तपासणीअंती मुल्यांकनानुसार झालेल्या तफावतीची रुपये ८०,१७६/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळातील लेखापाल व वसुली निरिक्षक यांना सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत

**(१८) * ३१९१५ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळामध्ये कार्यरत लेखापाल व वसुली निरिक्षक कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन धोरणानुसार सुधारीत वेतनश्रेणी मिळत नसल्याने लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २५ मे, २०१५, २६ फेब्रुवारी, २०१६, ११ मार्च, १०१६, १४ मे, २०१६ व २३ मे, २०१६ रोजी दिलेल्या पत्रानुसार कार्यवाही करण्याचे व्यवस्थापकीय संचालक, इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ यांना निर्देश देवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे, तसेच सदर अन्यायग्रस्त ८ कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) याबाबत राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

-----------------

## विक्रमगड व जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) ग्रामीण कुटीर रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) * ३४२०९ श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २७०८२ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड आणि जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) उप जिल्हा रुग्णालय व ग्रामीण रूग्णालयात मंजूर पदांपैकी ४० पदे रिक्त आहेत, ७ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये २० पदे रिक्त असल्याने येथील आदिवासी जनतेला आरोग्य सेवा मिळत नसल्याचे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील अतिदुर्गम भागातील नागरिकांना उपचारासाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांकडे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना वेळेवर औषधोपचार न मिळणे तसेच पावसाळ्यात या भागात मोठ्या प्रमाणात बालमृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व तद्नुसार आदिवासी भागातील रुग्णांना पूर्णक्षमतेने औषधोपचार मिळावेत व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, जव्हार व ग्रामीण रुग्णालय, विक्रमगड येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण १२० पदे मंजूर असून ७६ पदे भरलेली व ४४ पदे रिक्त आहेत. तसेच जव्हार व विक्रमगड तालुक्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण १४२ पदे मंजूर असून त्यापैकी १०८ पदे भरलेली व ३४ पदे रिक्त आहेत.

तथापि उपलब्ध वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होऊ दिली जात नाही.

(३) हे खरे नाही.

(४) वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ संवर्गाचे पद भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे. रुपये ५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत Walk in interview च्या माध्यमातून भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील भटक्या विमुक्त जमातीला क्रिमीलेयर संज्ञेमधून वगळण्याबाबत

**(२०) * ३१०७३ श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १४६३३ ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भटक्या विमुक्तांना क्रिमीलेयर संज्ञेमधून वगळण्यात येईल व त्यानंतर एका महिन्याच्या आत भटक्या विमुक्तांबाबत निर्णय घेतला जाईल असे मा.मंत्री यांनी सन २०१४ व सन २०१५ मध्ये आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी दिलेल्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४ च्या अहवालानुसार भटक्या विमुक्तांना क्रिमीलेयर मधून वगळण्यात यावे अशी स्पष्ट शिफारस करूनही अद्याप शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भटक्या विमुक्तांना क्रिमीलेयर संज्ञेमधून वगळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२), (३) व (४) राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी दिलेल्या अहवालाची छानननी शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

## सरपंच पदाची निवड थेट जनतेतून करण्याबाबतच्या शासन निर्णयाबाबत

**(२१) * ३४३७५ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामपंचायतीच्या सरपंचाची निवड थेट जनतेमधूनच केली जाणार असून शासनाने उमेदवारांसाठी सातवी इयत्ता उत्तीर्ण असणे ही पात्रता ठरविल्याचा निर्णय दिनांक ४ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सरपंचाची निवडणूक, निवडून आलेल्या सदस्यांकडून करण्यात येत असताना आता थेट जनतेतून सरपंचाची निवड करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर निर्णयाला बऱ्याच राजकीय पक्षांनी व जनतेनी विरोध केल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पूर्वीचीच पध्दत कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२), (३) व (४) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या विद्यमान तरतुदींनुसार, सरपंचाची निवड ही पंचायतीच्या निवडून दिलेल्या सदस्यांमधून बहुमताने करण्यात येते व सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांना सरपंचाविरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव मांडता येतो. सदस्य हे असे अविश्वासाचे प्रस्ताव वारंवार मांडत असल्याचे निदर्शनास आले असुन त्यामुळे सरपंचाच्या कार्यक्षमतेवर आणि पंचायतीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यावर परिणाम होत आहे.

त्यामुळे योग्य त्या विचारविमर्शानंतर, पंचायतीच्या कामकाजामध्ये स्थैर्य प्राप्त करुन देणे व थेट जनतेस जबाबदार असणारी व्यवस्था निर्माण करण्याच्यादृष्टीने जनतेमधून ग्रामपंचायतीचा सरपंच थेट निवड करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

-----------------

## श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व) व नॅशनल पार्क दरम्यान नदीवर बंधारा बांधून परिसराचे सुशोभीकरण करण्याबाबत

**(२२) * ३३३२४ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व) व नॅशनल पार्क दरम्यान नदीवर बंधारा बांधून, पाण्याची साठवण व बोटिंगची व्यवस्था करुन आजुबाजूचा परिसर सुशोभीकरण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.जलसंपदा मंत्री यांच्या दालनात बैठका होऊनही अद्यापी कोणती कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधीची तरतूद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

याबाबत दिनांक ११/४/२०१७ रोजी बैठक संपन्न झाली आहे.

(२) सदर बंधारा सिंचनासाठी नाही.

दहिसर नदीवर प्रस्तावित बंधाऱ्याचे काम ठेव तत्वावर बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्याचे प्रस्तावित होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्प रद्द केल्याचे दिनांक ०३/०६/२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) सदर काम ठेव तत्वावर असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामविकास विभागातील शिक्षक, लिपिक व राज्यस्तरीय वर्ग १ व २ पदांची बदली ऑनलाईन पध्दतीने राबविण्याबाबत

**(२३) * ३०९७७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागातील शिक्षक व लिपिकवर्गीय कर्मचारी त्याचप्रमाणे राज्यस्तरीय वर्ग १ व २ या पदांची बदली प्रकरणे ऑनलाईन पध्दतीने राबविली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन वर्ग १ व २ ची बदली प्रकरणे अधिकाऱ्यांच्या विकल्पानुसार करण्याचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्ग १ व वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना त्यांच्या विनंतीनुसार बदली प्रक्रिया राबविल्यास त्यांच्या कामाचा दर्जा सुधारुन शासनाच्या योजना योग्य पध्दतीने राबविल्या जातील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामविकास विभागातील वर्ग १ व २ ची बदली प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ग्रामविकास विभागांतर्गत केवळ जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या यावर्षीपासून ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत आहेत. लिपिकवर्गीय कर्मचारी आणि राज्यस्तरीय वर्ग १ व २ मधील अधिकाऱ्यांची बदली प्रकरणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिराळा (जि.सांगली) तालुक्यात धरण क्षेत्रातील भूकंप वेधशाळेच्या नोंदीबाबत

**(२४) * ३४२६३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील चांदोली धरण क्षेत्रातील वारणावतीसह पाच भूकंप वेधशाळेच्या नोंदी घेण्यासाठी वारणा पाटबंधारे विभागाने २५ वर्षापूर्वी वेधशाळेची निर्मिती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूकंप वेधशाळेच्या नोंदी घेण्याकरिता तज्ञ परिचारक नसल्याने चतुर्थश्रेणी कर्मचारी या नोंदी घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भूकंप वेधशाळेत तज्ञ परिचारकांसह अत्याधुनिक वेधशाळा उभारणीबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) चांदोली धरण क्षेत्रामध्ये भूकंप वेधशाळा नसून ५ भूकंपमापन केंद्रे उभारण्यात आली आहेत.

(२) वारणा प्रकल्पांतर्गत असणाऱ्या ५ भूकंपमापन केंद्रापैकी एका केंद्रात प्रयोगशाळा सहाय्यक कार्यरत असून उर्वरित ४ केंद्रांवर सद्य:स्थितीत उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचेकडून भूकंपमापक यंत्रास भूकंप नोंदीचे आलेख पेपर लावणे व काढणे अशी कामे करण्यात येत आहेत. यासाठी त्यांना तांत्रिक कर्मचाऱ्यांकडून प्रशिक्षण देण्यात आले आहे. सदर आलेख पेपरवर भूकंपाची नोंद झाल्यावर ते आलेख पेपर मेरी, नाशिक यांचे कार्यालयाकडे विश्लेषणासाठी पाठविले जातात.

(३) सदर भूकंपमापन केंद्राच्या उभारणीच्या आवश्यकतेबाबत आढावा घेवून कार्यवाही करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मुरबाड तालुक्यातील काळू नदीवर व शहापूर तालुक्यातील शाई नदीवर धरणे उभारण्याचा प्रस्तावाबाबत

**(२५) * ३२२४६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी मुरबाड तालुक्यातील काळू नदीवर व शहापूर तालुक्यातील शाई नदीवर धरणे उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळू व शाई नदीवरील धरणाच्या कामासाठी शासनाने नियमानुसार प्रक्रिया राबविली नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या उल्हास नदीचे पाणी अपुरे पडत असल्याने काळू व शाई नदीवरील धरणाची कामे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी मुरबाड तालुक्यातील काळू नदीवर धरण बांधण्यासाठी शासनाने दिनांक ९/७/२००९ च्या पत्रान्वये, मुंबई महानगरक्षेत्राच्या पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे स्वखर्चाने विकसित करण्यासाठी मान्यता दिली आहे. तसेच मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने प्राधिकरणाच्या झालेल्या बैठकीत काळू प्रकल्पासाठी रुपये ६५७.५८ कोटी व शहापूर तालुक्यातील शाई नदीवर धरण बांधण्यासाठी रुपये ६४५.४० कोटी किंमतीसाठी दिनांक ०३/०८/२००९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर धरणे मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे मुंबई उपप्रदेशाकरिता कोंकण विकास महामंडळामार्फत ठेव तत्वावर हाती घेण्यात आलेली आहेत.

सद्य:स्थितीत दोन्ही धरणांची कामे बंद आहेत.

(२) नाही.

(३) व (४) शासनाने दिनांक २३/९/२०१६ च्या शासन निर्णयानुसार ACB मार्फत चौकशी सुरू असलेल्या प्रकल्पांची निविदा विखंडीत करून नव्याने निविदा प्रक्रिया करण्याचे आदेश दिले आहेत, त्यानुसार निविदा रद्द करण्यात आलेल्या असून, त्याविरोधात ठेकेदाराने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून सदर दोन्ही निविदांचे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## राज्यातील अनेक भागात डेंग्यू व लेप्टोस्पायरोसिसची लागण झाल्याबाबत

**(२६) * ३४४५६ श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह, ठाणे, पुणे व राज्यातील अनेक भागात डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस सारख्या आजाराची अनेकांना लागण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर साथरोग आटोक्यात आणण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०१७ (माहे जानेवारी ते १४ जुलै, २०१७ पर्यंत) या कालावधीत मुंबईसह ठाणे, पुणे या जिल्हयात डेंग्युचे ५४४ रुग्ण आढळले असून त्यापैकी १ व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तसेच लेप्टोस्पारोसिस या आजाराचे ६८ रुग्ण आढळले असून त्यापैकी ३ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

(२) राज्यात साथरोग आजारांच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

- आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.
- साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.

- जलजन्य आजार नियंत्रणासाठी नियमित पाणी गुणवत्ता संनियंत्रण.
- राज्यात वर्षातून २ वेळा स्वच्छता सर्वेक्षण.
- कोकण विभागातील आरोग्य संस्थांमध्ये लेप्टो निदान व उपचाराची व्यवस्था.
- राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी ३७ सेंटीनल सेंटर्सची स्थापना केली असून राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथेही निदानाची व्यवस्था आहे.
- राज्यात गप्पीमासे पैदास केंद्र कार्यरत असून राज्यातील डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.
- नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- उद्रेकग्रस्त ठिकाणी किटकनाशकाची धूरफवारणी.
- शासकीय तसेच खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे डेंग्यू रुग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.
- डेंगी रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.
- सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.
- १६ मे, २०१७ हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस म्हणून विविध उपक्रमाद्वारे साजरा केला.
- दरवर्षी जुलै महिना डेंगी विरोधी महिना म्हणून साजरा केला जातो.
- शालेय डेंग्यू जागृती मोहिम.
- उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/ विभागीय/ राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.
- लेप्टो प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी आंतरविभागीय समन्वय.
- विविध माध्यमाद्वांरे जनतेस आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाळवंडी (ता.जि.बीड) येथील रोहयोमधील विविध कामात अपहार झाल्याबाबत

**(२७) * ३३२२६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाळवंडी (ता.जि.बीड) येथे रोहयो मधील विविध कामात मोठया प्रमाणात अपहार झालेला असून या कामांची चौकशी करण्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाळवंडी येथील पाणीपुरवठा योजनेबाबतची लेखी तक्रार ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) नाळवंडी येथील रोहयोच्या कामांची चौकशी करण्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाकडे लेखी तक्रार केल्याचे खरे आहे.

(२) नाळवंडी येथील पाणीपुरवठा योजनेबाबतची लेखी तक्रार ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे केली हे ही खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे, परंतू तक्रारीत तथ्य नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामीण रुग्णालय (ता.म्हसळा, जि.रायगड) येथे अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत

**(२८) * ३२६२६ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागात कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन होवून ३ वर्षे पूर्ण झाली तरी सदर रुग्णालयात अधिकारी, कर्मचारी नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयातील यंत्रसामुग्री विनावापर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालयात अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करुन यंत्रसामुग्रीचा वापर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, म्हसळा, जि.रायगड येथील इमारतीच्या तळमजल्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत बांधकाम पूर्ण झाले नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतीचा ताबा प्राप्त झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडदेवदरी वनक्षेत्रातील मोरांचा पाण्याअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(२९) * ३३६९९ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद विभागीय वन कार्यालयापासून १३ कि.मी. अंतरावर असलेल्या गडदेवदरी वनक्षेत्रातील मोरांना पिण्यासाठी पाणी न मिळाल्यामुळे त्यांचा माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे वन क्षेत्रातील पाणवठ्यांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणवठयांची दुरवस्था दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) उस्मानाबाद विभागीय वन कार्यालयापासून १३ किलोमीटर अंतरावर असलेल्या गडदेवदरी वनक्षेत्रात दिनांक १३/०५/२०१७ रोजी ४ मोर व १० लांडोर मृत अवस्थेत तर १ मोर बेशुध्द अवस्थेत आढळून आला आहे.

बेशुध्द अवस्थेतील मोरावर पशुवैद्यकिय चिकित्सालयात उपचार करण्यात आले. सदर मोराची प्रकृती सुधारल्यानंतर पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार हातलादेवी टेकडी शेजारील वनक्षेत्रात निसर्गमुक्त करण्यात आले.

मृत अवस्थेत आढळून आलेले ४ मोर व १० लांडोर यांचा मृत्यू हा उष्माघातामुळे हृदय बंद पडल्याने झाला आहे असे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन अधिकारी, उस्मानाबाद यांनी त्यांचे शवविच्छेदन अहवालात नमूद केले आहे.

सन २०१७ च्या उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्याकरीता गडदेवदरी वनक्षेत्रालगतच्या साठवण तलावात मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होते. तसेच घटनास्थळापासून ३० मीटर अंतरावर ग्रामीण पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाईपलाईन असून तेथे पाळीव व वन्यप्राणी यांना पिण्याचे पाणी कायमस्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे बिरमणी (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) * ३४५२८ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बिरमणी (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत ग्रामस्थांनी, ग्रामपंचायत (बिरमणी) तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सातारा) यांनी मा.ग्रामविकास मंत्री व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्नांकित रस्ता प्रजिमा-१७ ते बिरमणी जोडरस्ता ग्रामीण मार्ग क्र. ६२ असून या रस्त्याची एकूण लांबी ४.८०० कि.मी. इतकी आहे. त्यापैकी ०/०० ते ३/८०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची व ३/८०० ते ४/८०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभागाची आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ अंतर्गत ३०५४ ग्रामीण मार्ग विकास कार्यक्रम व मजबुतीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत या रस्त्याच्या रुपये ३०.०० लक्षच्या कामास मंजूरी प्राप्त आहे. निविदा निश्चितेची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर काम जिल्हा परिषदेमार्फत सुरु करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३१) * ३१०५२ श्री.नारायण राणे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.बाळाराम पाटील, श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २८१०२ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १२ हजार, ९१५ वैद्यकीय संस्था कार्यरत असून आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये वर्षभरात २५०० हून अधिक बालमृत्यू झाल्याने बालमृत्यू आणि कुपोषण यावर न्यायालयाने गंभीर आरोप करुन करुनही आदिवासी भागातील बहुतेक प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरवस्थेत असून तेथे सुमारे १४ वर्षापासून काम करणाऱ्या ७९१ बी.ए.एम.एस. डॉक्टरांना व भरारी पथकातील १७१ डॉक्टरांना तीन महिन्यात शासकीय सेवेत कायम करण्यात येईल असे आश्वासन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून भरारी पथकातील १७१ डॉक्टरांना जीप गाड्यासह सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्वासनाची पूर्तता केलेली नसून रिक्त पदाअभावी बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, आरोग्य संचालनालयात अतिरिक्त आरोग्य संचालक, सहसंचालक, उपसंचालक पदासह एकूण १४ हजार १५५ पदे रिक्त असून प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वच्छतागृहेही नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोग्य सेवेतील आदिवासी बहुल जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील सर्व जागा विनाविलंब भरण्याच्यादृष्टीने तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, उप प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सोईसुविधा व औषधाचा पुरवठा होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य विभागांतर्गत राज्यात १२९०५ आरोग्य संस्था कार्यान्वित असून सदर संस्थांमध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण ५३६२८ पदे मंजूर असून ३८४३३ पदे भरलेली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील एकूण १६ आदिवासी जिल्हयामध्ये सन २०१६-१७ या वर्षभरातील बालमृत्युंची संख्या २८१८ आहे. राज्यातील आदिवासी भागात एकूण ३१५ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित असून दुरुस्ती आवश्यक असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या ८८ आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या देखभाल दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही केली जाते व त्यासाठी जिल्हास्तरावरुन निधी दिला जातो.

आदिवासी क्षेत्रात कार्यरत ७९१ अस्थायी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी व भरारी पथकातील १७२ डॉक्टरांना शासकीय सेवेत कायम करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

आदिवासी भागातील २८१ भरारी पथकांपैकी ११४ भरारी पथकांना भाडेतत्वावरील वाहने उपलब्ध आहेत. तसेच जिल्हास्तरावर भाडेतत्वावर वाहन उपलब्ध न झाल्यास तालुकास्तरावरुन निविदा प्रक्रिया करुन वाहन उपलब्ध करुन घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

नवसंजिवनी कार्यक्रमाच्या अहवालानुसार बाल व माता मृत्यूचे प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.

(४) व (५) हे अंशतः खरे आहे,

उत्तरातील भाग १ प्रमाणे महाराष्ट्र वैद्यकीय सेवा गट-अ वर्ग-१ संवर्गाची पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे. रुपये ५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत Walk in interview च्या माध्यमातून भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सद्य:स्थितीमध्ये राज्यात १८१४ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून त्यापैकी ४३ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्वच्छतागृहे उपलब्ध नसून तेथे स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे तेथे औषध व साहित्य पुरविण्यासाठी आदिवासी विकास विभाग डीपीडीसी अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत थेट अनुदान उपलब्ध होते. आरोग्य संचालनालयाच्या तांत्रिक मान्यतेने जिल्हा परिषद स्तरावर औषधे व साहित्याची खरेदी करुन ती आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये वितरीत केली जातात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्याबाबत

**(३२) * ३२०७७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६८११ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य जल परिषदेच्या दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार प्रगतीत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी स्थापित तज्ञ समितीचा अहवाल माहे मार्च, २०१७ पर्यंत शासनास प्राप्त होणे अपेक्षित असलेला अहवाल प्राप्त झालेला आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत अहवालाच्या अनुषंगाने त्यावर निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

दिनांक १७/०१/२०१५ रोजी संपन्न झालेल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा, राज्य जल मंडळासमोर सादर करण्यात आला व त्यास राज्य जल मंडळाने दिनांक ०८/०५/२०१५ रोजी तत्वत: मान्यता दिली आहे.
(२) होय.

गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी स्थापन केलेल्या तज्ञ समितीचा अहवाल दिनांक १३/०७/२०१७ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.
(३) तज्ञ समितीकडून शासनास सादर करण्यात आलेल्या गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखड्यास मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील राज्य जल मंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर आराखड्यास राज्य जल मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३३) * ३३१४७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने जिल्हा परिषद सदस्यांनी रस्ते दुरुस्तीची मागणी केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील रस्ते, पुलांची दुरवस्था झाली होती. त्यावेळी जिल्हा परिषदेने पुरामुळे झालेल्या हानीसाठी रुपये १५८ कोटीची मागणी शासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५-१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील रस्ते व पुल नादुरुस्त झाले होते तेव्हा रुपये ९७ कोटीची मागणी शासनाकडे केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यात १० हजार कि.मी. लांबीचे रस्ते असतानाही सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून पुरेसा निधी दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधीचे दोन्ही प्रस्ताव मंजूरीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१३-१४ मध्ये अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या पुल/रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी रुपये १५८६७.९० लक्ष रक्कमेचा प्रस्ताव शासनास जिल्हा परिषदेने पाठविला होता.

(३) अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता रुपये १२२.६१ कोटी रक्कमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे जिल्हा परिषदेने पाठविला होता.

(४) रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांची लांबी व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

(५) सन २०१३-१४ या वर्षात अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीसाठी नागपूर जिल्ह्यासाठी रुपये ३२४४.२९ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून त्यामध्ये १९७ कामे जिल्हा परिषदेने पूर्ण केली आहेत.

तसेच सन २०१५-१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावासही निधी प्राप्त झाला नाही. परंतु जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त रुपये २७८.९१ लक्ष निधीमधून २५ कामे घेण्यात आली असून २२ कामे पूर्ण झालेली आहेत व उर्वरीत ३ कामे प्रगतीत आहेत.

दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ च्या पत्रान्वये रस्त्यावरील वाहतूक सुरळीत रहाण्याच्यादृष्टीने अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या रस्त्यांची/ पुलांची तातडीने दुरुस्ती होण्यासाठी जिल्हा परिषदांनी रस्ते व पुल दुरुस्ती गट अ व ड कार्यक्रमांतर्गत अशी कामे प्राधान्याने घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## पुणे शहरातील नागरिकांना अल्पदरात औषधे पुरविण्याबाबत

**(३४) * ३४३८६ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात आरोग्य विभागाकडून खरेदी करण्यात आलेली स्वस्त दरातील जेनेरिक औषधे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास शासकीय यंत्रणा अपयशी ठरत असल्याने रुग्णांचे आर्थिक हाल होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार स्वस्त दरातील जेनेरिक औषधे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांना लागणारी औषधे ही जेनेरिक पद्धतीनेच खरेदी करण्यात येतात व आरोग्य संस्थांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना सदर औषधे मोफत पुरवली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय सेवानिवृत्तीधारकांसाठी अग्रिम निवृत्ती वेतनवाढ देण्याबाबत

**(३५) * ३४५१८ श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू होण्याकरीता माहे जुलै, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात शासकीय कर्मचारी संघटना संपावर जाणार होते, त्यासंबंधात मा.मुख्यमंत्री यांच्याबरोबर शिष्टमंडळासोबत नुकतीच एक बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत काय निर्णय झाला व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच ७ वा वेतन आयोग उशीरा लागू करण्यात येत असेल तर सेवानिवृत्तीधारकांसाठी त्यांच्या वयाचा व समस्यांचा विचार करुन त्यांना अग्रिम निवृत्ती वेतनवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाप्रमाणे ७ व्या वेतन आयोगाचा लाभ देण्यात येईल, असा निर्णय सदर बैठकीत घेण्यात आला आहे.

(३) व (४) सेवानिवृत्तीधारकांसाठी अग्रिम निवृत्ती वेतनवाढ देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मुशेत पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३६) * ३२४७७ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मुशेत-मापगाव रस्त्यावरील मुशेत पुलावरून रेवस, बेलवले, बहिरोळे, मापगाव, कनकेश्वर, कार्लेखिंड मार्गावरील वाहनांची पूलावरून सातत्याने वाहतूक सुरू असून या पुलाच्या गाळ्यावर १२ फूट रूंदीचा लोखंडी पत्रा बसवून वाहतूक सुरू केल्याने अवजड वाहनाच्या वाहतूकीमुळे पुल वाहतूकीकरीता धोकादायक झाला असल्याची तक्रार विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी नवीन पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारची तक्रार प्राप्त नाही. तथापि, सदर पुल नादुरुस्त झाला असून त्यावर कोणत्याही प्रकारची अवजड वाहतूक करु नये याबाबत नामफलक लावण्यात आलेला आहे.

(२) सदर पुलाची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून चोंढी मुशेत मापगाव बहिरोळे बेलवली झालखंड रस्त्यावर अस्तित्वात असलेल्या पुलाचे नव्याने बांधकाम करणे आवश्यक असल्याने या पुलाचे बांधकाम नाबार्ड-२२ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील सामान्य व उपजिल्हा रुग्णालयातील समस्यांवर उपाययोजना करण्याबाबत

**(३७) * ३३८०७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील सामान्य रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षकासह विविध संवर्गातील २९ पदे रिक्त असल्याने गरीब रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत रुग्णालय प्रशासनाकडून वरिष्ठांकडे प्रस्ताव पाठविले जात असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज सुमारे ४०००० ते ५०००० लोक येत असून पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पुरविण्यात येणाऱ्या सुविधा भाविक व स्थानिक नागरिकांच्या तुलनेत कमी पडत असल्याने सदर रुग्णालयात अस्वच्छता, उपचार पध्दती, बाहेरील मेडिकलमधून औषधे आणणे यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंढरपूर येथील सामान्य रुग्णालयातील रिक्त पदे भरून उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या भाविकांची व स्थानिकांची गैररसोय दूर करण्यासाठी तेथे डॉक्टरांची संख्या वाढवून नवीन अत्यावश्यक यंत्रसामुग्री पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशतः खरे आहे.

पंढरपूर (जि.सोलापूर) या उपजिल्हा रुग्णालयात सद्य:स्थितीत विविध संवर्गातील एकूण १०० पदे मंजूर असून, त्यापैकी २६ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांअभावी गरीब रुग्णांची गैरसोय झालेली नसून सर्व विभागाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालू आहे.

(२) हे खरे नाही.

पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये रिक्त पदांअभावी नागरिकांची गैरसोय झालेली नाही. रुग्णालयातील स्वच्छता सेवेबाबतचा करार दिनांक ३१/५/२०१७ रोजी संपुष्टात आलेला असल्याने रुग्णसेवेच्यादृष्टीने रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या मार्फत स्वच्छता करुन घेतली जात आहे. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर यांचेमार्फत सर्व प्रकारची औषधे पुरविली जात आहेत. अत्यावश्यक औषधे खरेदी करण्यासाठी संचालनालय, उपसंचालक, आरकेएस, एनएचएम यांचे स्तरावरुन अनुदान उपलब्ध करुन दिले जात असून आवश्यक प्रमाणात औषध साठा शिल्लक आहे. कोणत्याही रुग्णास खाजगी औषध भांडारमधुन औषधे आणण्यास सांगितले जात नाही.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००) मधील रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) मधील रिक्त पदे जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत थेट मुलाखतीद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्यास्तरावर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून लवकरच पदे भरण्यात येतील. तसेच उपजिल्हा रुग्णालय येथे विविध कक्षांतर्गत अत्यावश्यक साहित्य व साधन सामुग्री उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे रूईखेड टेकाडे-सव (ता.जि.बुलढाणा) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३८) * ३३३१२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रूईखेड टेकाडे-सव (ता.जि.बुलढाणा) रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ होऊन जिवित व वित्तहानी झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारांवर व सर्व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली हे खरे नाही.

(२) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून सन २०१४-१५ मध्ये सा.क्र. १/६०० ते २/९९८, ३/५६० ते ३/८५० व ४/८०० ते ५/३०० या लांबीमध्ये रस्ता दुरुस्तीचे काम करण्यात आले असून सदर काम सुस्थितीत आहे. त्यामुळे ठेकेदारांवर व संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सदर रस्त्याच्या खराब लांबीतील रस्ता दुरुस्तीच्या कामाचा समावेश जिल्हा वार्षिक योजना/३०५४ गट ब अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सॅनिटरी नॅपकिनवर कर लागू झाल्याबाबत

**(३९) * ३२७५३ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जुलै, २०१७ पासून लागू होणाऱ्या जीएसटीमध्ये सॅनिटरी नॅपकिनवर १४.५ टक्क्यापर्यंत कर लागू होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लागू होणाऱ्या कराविरोधात देशभरात अनेक स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्त्यांनी मोहिम सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सॅनिटरी नॅपकिन करमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक १ जुलै, २०१७ ला लागू झालेल्या वस्तू व सेवा कर अधिनियमांतर्गत सॅनिटरी नॅपकीनवर ६% महाराष्ट्र वस्तू व सेवा कर व ६% कैंद्रिय वस्तू व सेवा कर असा एकत्रित १२% कर लागू झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) वस्तू व सेवा कर अधिनियमांतर्गत वस्तू व सेवावरील कराचे दर शिफारस करण्याचे अधिकार वस्तू व सेवा कर परिषदेस आहेत व परिषदेने शिफारस केलेल्या दराप्रमाणेच कराची आकारणी करण्याची शासनाची भूमिका आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात बंधाऱ्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४०) * ३३४३५ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात वित्त विभागाची मान्यता न घेता बंधाऱ्याची कामे करुन गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी जिल्हाध्यक्ष, औरंगाबाद यांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री व मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वित्त विभागाची मान्यता न घेता बंधाऱ्याच्या कामांना कार्यारंभ करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

परंतु या प्रकरणी जिल्हाध्यक्ष, औरंगाबाद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडे तक्रार केली आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडे प्राप्त तक्रारी नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे. जिल्हा परिषदेने सन २०१६-१७ मध्ये १८२ कामांना प्रशासकिय मान्यता दिल्या आहेत. त्यापुर्वी महाराष्ट्र लेखा संहिता अधिनियम १९६८ मधील परिशिष्ट एक (नियम ३) ड नुसार वित्त विभागाची संमती घेतली आहे. कोणतीही प्रशासकीय मान्यता वित्त विभागाच्या सहमतीशिवाय देण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमीला "ब" वर्ग तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत

**(४१) * ३१४३५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २६९१३ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमीला "ब" वर्ग तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळाचा दर्जा मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुक्तीभूमीवर येणाऱ्या पर्यटकांना व भाविकांना जास्तीत जास्त सुविधा निर्माण होण्यासाठी या स्थळाचा "ब" वर्ग तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळामध्ये समावेश करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ सप्टेंबर, २०१६, दिनांक २५ व २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) येवल्याच्या मुक्तीभूमीला "ब" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा व निधी उपलब्ध होणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांनी ग्रामविकास विभागास सादर केला होता. तो प्रस्ताव ग्रामविकास विभागाने दिनांक २८/११/२०१६ च्या पत्रान्वये सामाजिक न्याय विभाग, नगर विकास विभाग व पर्यटन विभाग या संबंधित विभागांकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविला होता.

(२) पर्यटकांना व भाविकांना जास्तीत जास्त सुविधा निर्माण करण्यासाठी सदर तिर्थस्थळाचा "ब" वर्ग तिर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळामध्ये समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१/०४/२०१७ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी या स्थळास "ब" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव "ब" वर्ग पर्यटन स्थळे घोषित करण्यासाठी निश्चित केलेल्या निकषांनुसार तपासण्यात आला. तथापि, येवला येथील मुक्तीभूमीला तिर्थक्षेत्राचा किंवा पर्यटन स्थळाचा कोणताही दर्जा दिलेला नसल्यामुळे "ब" वर्ग पर्यटन स्थळे घोषित करण्यासंबंधिच्या निकषांची पुर्तता होत नसल्यामुळे येवला मुक्तीभूमीला "ब" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

"ब" वर्ग तिर्थक्षेत्रात समावेश करण्याची बाब नगर विकास विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागास योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत

**(४२) * ३११७२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २५५९६ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महत्वाचे सुमारे ५७ सिंचन प्रकल्प अनेक वर्षापासून प्रलंबित असून सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे ८० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने भूसंपादनास प्रशासकिय आणि वन विभागाच्या मान्यतेशिवाय काही पाटबंधारे प्रकल्पाच्या वाढीव खर्चाला मंजुरी दिल्याने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे राज्यातील ५७ सिंचन प्रकल्पांच्या खर्चात रुपये ९ हजार कोटींची वाढ झाली आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधीची उपलब्धता करण्यासाठी कोणते नियोजन करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ च्या महाराष्ट्र राज्याचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालात "राज्यातील ५७ पाटबंधारे प्रकल्प ३० वर्षापेक्षा अधिक काळापासुन प्रलंबित आहेत" असा उल्लेख करण्यात आला आहे.

(२) नाही. तथापी जलसंपदा विभागाच्या दिनांक ०९/१२/२०१३ च्या पत्रानुसार "प्रस्तावित असलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीच्या तरतूदींच्या मर्यादेत व यापूर्वी मंजूर प्रशासकीय मान्यता/ सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालाच्या व्याप्तीतील कामांसाठी आवश्यक "ब" भूसंपादन या उपशिर्षांतर्गत उदा. भूसंपादन, पुनर्वसन व वन जमीन हस्तांतरण इ. साठी करावयाच्या वैधानिक कामांकरिता वर्षनिहाय मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदींच्या मर्यादेत खर्च करण्यास" शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे ज्या प्रकल्पांचा सु.प्र.मा. प्राप्त नाही अशा प्रकल्पांचा भूसंपादनापोटी होणारी वाढ टाळता आली आहे. तसेच शेतक-यांना वेळेवर भूसंपादन मोबदला अदा करणे शक्य झाले आहे.

(३) नाही.

(४) सदर प्रकल्पांसाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रुपये १९६२ कोटीची तरतूद करणेत आली आहे. प्रकल्प पूर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याबाबत आढावा घेवून त्यानुसार प्रकल्पाचा अग्रक्रम ठरविण्यात येईल व या प्राधान्यक्रमानुसार आर्थिक गुंतवणूक केली जाईल. ज्या प्रकल्पांपासून पुढील ३ वर्षामध्ये प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांस मिळू शकेल, अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा निर्णय वित्त विभागाच्या श्वेतपत्रिकेमध्ये शासनाने घेतला आहे. मा.राज्यपाल महोदयांचे निर्देश व राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार वार्षिक अर्थसंकल्पात प्रकल्पांसाठी तरतूद करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साकुरी (नि) (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील तत्कालीन ग्रामसेवकाने गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३) * ३१६६६ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकुरी (नि) (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील गावठाण क्षेत्रात घर नं. २६२ च्या मुळ नोंदणीमध्ये तत्कालीन ग्रामसेवकाने खाडाखोड केल्याबाबत त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लेखी तक्रार देऊनही अद्यापही या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत गटविकास अधिकारी, मालेगांव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) जिल्हा परिषद, नाशिक हे दिरंगाई करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ आर्थिक लाभासाठी सदर ग्रामसेवकाने मूळ दस्तऐवजात खाडाखोड केली असून, त्यांचेवर दप्तर दिरंगाई प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी ग्रामसेवक व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२), (३), (४) व (५) संबंधित दोन ग्रामसेवकांविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्यापैकी एकाची चौकशी पूर्ण करण्यात येऊन त्याची एक वेतनवाढ कायमस्वरूपी बंद करण्यात आली आहे. दुसऱ्या ग्रामसेवकाविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.

-----------------

## नागपूर येथील डागा स्मृती स्त्री रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(४४) * ३१७६१ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डागा स्मृती स्त्री रूग्णालयात प्रसूतीगृह असून सदर रूग्णालयात एका खाटेवर दोन-दोन महिला रूग्ण उपचार घेत असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालयाची खाटांची क्षमता ३६५ असून नवीन ५०० खाटांच्या वाढीव रूग्णालयाला मंजूरी मिळूनही रूग्णालयाचे बांधकाम प्रलंबित असल्याने महिला रूग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ५०० खाटांचे वाढीव रुग्णालय बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: हे खरे आहे.

प्रसूतीगृहात बेडची क्षमता २४ असून स्वाभाविक प्रसूतीकरिता २५ रुग्ण भरती झाल्याने तातडीच्या परिस्थितीमध्ये रुग्ण संख्या वाढल्याने केवळ प्रसूतीपूर्व तपासणीसाठी एका खाटेवर दोन रुग्ण घेण्यात आले. सदर रुग्णांची तात्काळ तपासणी करण्यात आली व नंतर त्यांना औषधोपचार करुन बेड उपलब्ध करुन दिले.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक ९ जून, २०१४ अन्वये ३६५ खाटावरुन ५०० खाटामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी दिली असून बांधकामासाठी अंदाज आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील बालगृहांना अन्न पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराचे थकित देयक अदा करण्याबाबत

**(४५) * ३३३५१ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या बालगृहांना अन्न पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराचे सन २०१४ पासूनचे देयक थकित असल्याने कंत्राटदाराने १ मे पासून बालगृहातील रेशन पुरवठा बंद केल्याने बालगृहातील २०० मुलांना उपाशी रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदाराचे थकित देयक अदा करण्याबाबत आर्थिक तरतूद न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) शासकीय मुलांचे बालगृह, कनिष्ठ निरीक्षणगृह व वरिष्ठ अनुरक्षणगृह, शासकिय मुलींचे कनिष्ठ व वरिष्ठ बालगृह, नागपूर या संस्थाचा पुरवठा पुरवठादारांनी बंद केल्याने जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या निर्देशानुसार टचस्टोन फाऊंडेशनद्वारा अक्षयपात्र (सेंट्रल किचन) नागपूर या संस्थेकडून दिनांक १२ मे, २०१७ पासून संस्थेमध्ये दाखल प्रवेशितांना आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे.

(२) राज्यातील शासकिय संस्थांची वेतनेत्तर बाबीवरील थकित देयके अदा करण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव जुलै, २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात विधानमंडळासमोर सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४६) * ३१०७४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री पुढील** गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेंतर्गत दिनांक ६ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास बंजारा लभाण वस्तीच्या ९५ कामास व वि.जा.भ.ज. वस्तीच्या १०१ कामास अध्यक्ष आणि सचिव या दोघांच्या समितीने मान्यता दिल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय क्र. तासुयो२०१४/प्र.क्र.१६८विजाभज-१, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ नुसार राज्यात जिल्हास्तरावर जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ३ सदस्यीय समिती या योजनेसाठी गठीत केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ येथे मुख्य कार्यकारी अधिकारी व सहायक आयुक्त यांनी आर्थिक व्यवहार करून यादी मंजूर करुन या यादीमध्ये ३ लाखांच्यावर एकही काम जाऊ न देता सदर काम ई-निविदेमार्फत केलेले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात औषध खरेदीत अनियमितता झाल्याबाबत

**(४७) * ३४३७७ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३ ते २०१७ या कालावधीत ॲन्टीडी, आरएचडी ३०० एमसीजी या औषधांच्या खरेदीत मोठया प्रमाणावर अनियमितता झाली असून याची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाला ॲन्टीडीच्या ४ हजार ८०० बाटल्या पुरविण्यात आल्या होत्या परंतु ही औषधे गरजेपेक्षा जास्त असल्याने त्या परत घेण्याबाबत रत्नागिरी रुग्णालयाच्या शल्यचिकित्सकांनी दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी संचालक, आरोग्य विभाग यांना पत्र पाठवून सुध्दा त्या परत न घेतल्यामुळे सदर औषधे वाया गेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी यांनी मागणी नोंदविली होती. त्यानुसार जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे ४,८०० इंन्जे. अँटी डी औषधांचा पुरवठा करण्यात आला. तथापि, अपेक्षेइतके रुग्ण न आल्याने २,२९३ इंग्जे. अँटी डी मुदतबाह्य झाले.

पुरवठा करण्यात आलेल्या इंग्जे. अँटी डी चा सेल्फ लाइफ कमी असल्याने सदर औषध बदलून देण्याबाबत पुरवठादारास कळविण्यात आले असून त्या प्रित्यर्थचे रुपये ६४,०३,३०६/- इतक्या रकमेचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कसारा (जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात आदिवासी महिलेची प्रसूती केल्याबाबत

**(४८) * ३३४३४ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा (जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर तसेच पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने शहापूर तालुक्यातील खरपत (सावरोली) येथील आदिवासी महिलेची प्रसूती आवारातच करण्यात आल्याचे दिनांक १८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रसूती झाल्यानंतर सदर महिलेस किन्हवली येथील आरोग्य केंद्रात नेले असता तेथेही डॉक्टर व अन्य कर्मचारी नसल्याने शेणवा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

सदर घटना प्राथमिक आरोग्य केंद्र, कसारा येथे घडलेली नसून ती प्राथमिक केंद्र, टाकीपठार, ता.शहापूर, जि.ठाणे येथे घडलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर घटना घडल्यानंतर दिनांक १९/०६/२०१७ रोजी साथरोग वैद्यकीय अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, यांच्या चौकशी पथकाव्दारे चौकशी करण्यात आली असून जिल्हा परिषदेमार्फत दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करुन त्यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, किन्हवली येथील संबंधित कंत्राटी आरोग्य सहाय्यिका यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

गैरहजर वैद्यकीय अधिकारी यांच्याविरुध्द नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात ग्रामविकास विभागातील लिपिक संवर्गाची वेतनश्रेणी वाढविण्याबाबत

**(४९) * ३०९७८ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हापरिषदेच्या लिपिकवर्गीय संघटनांनी त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा तसेच इतर मागण्यासंदर्भात मा.ग्रामविकास मंत्री व प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचेकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागातील लिपिक व ग्रामविकास विभागातील लिपिक यांची वेतनश्रेणी व पदोन्नती यामध्ये तफावत असल्याने ग्रामविकास विभागातील लिपिक संवर्गावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामविकास विभागातील लिपिक संवर्गाच्या वेतनश्रेणीत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपीकवर्गीय कर्मचारी संघटना यांच्याकडून दिनांक १६/०३/२०१७ व १४/०७/२०१७ च्या पत्रान्वये तसेच महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन यांच्याकडून दिनांक ०९/१२/२०१६ च्या पत्रान्वये निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(२) व (३) जिल्हा परिषदेतील लिपीक संवर्गीय पदांच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव ५ व्या व ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन त्रुटी समितीने अमान्य केलेला आहे. तरीही “राज्यातील जिल्हा परिषद लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतन, ग्रेड-पे दुरुस्ती व इतर प्रलंबित मागण्या मंजूर करण्याबाबत” विनंती अर्ज समितीने दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दारव्हा तालुक्यात (जि.यवतमाळ) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५०) * ३४२३७ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयांतर्गत दारव्हा, नेर, आर्णी व बाभुळगाव तालुक्यामध्ये (जि.यवतमाळ) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करोडो रुपयांची देयके अदा करुन गैरव्यवहार झाल्याचे कृषि आयुक्तालयातील तपासणी पथकाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दारव्हा उपविभागांतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षात नाला खोलीकरण व रुंदीकरण तांत्रिक मंजुरी देताना योजनेत शासन निर्णय व खात्याच्या मार्गदर्शक सूचनांचा भंग झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जादा दर वापरुन अडीच ते तीन पट अंदाजपत्रक वाढवून उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मंजुरी देऊन शासनाचे नुकसान केले असून सदर प्रकरणाची विभागीय कृषी सहसंचालकामार्फत केलेल्या चौकशीत निदर्शनास येऊनही फौजदारी कारवाई न करता उपविभागीय अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांनी पथकाव्दारे मौजा धामनगाव देव, ता.दारव्हा येथील अस्तित्वातील सिमेंट नाला बांध खोलीकरण कामांची तपासणी केली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांचे तपासणी पथकाच्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी प्रत्यक्ष केलेल्या कामापेक्षा जास्तीची मापे नोंदणी करून रक्कम रुपये १०.८१ लाखाचे अतिप्रदान केल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व कृषि पर्यवेक्षक, दारव्हा यांचेवर नियमानुसार अतिप्रदान रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच कृषि पर्यवेक्षक व कृषिसेवक यांचेवर निलंबनाची कारवाई करून संबंधित चार अधिकारी/कर्मचारी यांचेवर म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील ८/१२ अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेंच व्याघ्र प्रकल्पांतील (जि.नागपूर) सालेघाट वनपरिक्षेत्रात वाघीण मृतावस्थेत आढळल्याबाबत

**(५१) * ३२२५९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत सालेघाट वनपरिक्षेत्रात दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास वाघीण मृतावस्थेत आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत उमरेड अभयारण्यातील जय वाघ मागील १ वर्षापासून बेपत्ता असून तो अजूनही सापडलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेपत्ता जय वाघाच्या शोधप्रकरणी केंद्रीय एसआयटी समितीने वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी व १० ते १५ कर्मचारी दोषी असल्याचे अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पेंच व्याघ्र प्रकल्पात होत असलेल्या वाघांच्या मृत्यूबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासाठी व वाघांच्या संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक १७/०४/२०१७ रोजी गस्ती दरम्यान पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत वाघ (मादी) मृत्तावस्थेत आढळून आली.

(२) पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत असलेल्या संरक्षित क्षेत्रामध्ये UK-T१ (जय) वाघाचे कोणतेही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पुरावे आढळून आलेले नाही व UK-T१ (जय) वाघ दिसून आलेला नाही.

(३) UK-T१ (जय) वाघाच्या शोध प्रकरणी केंद्रीय एसआयटी समितीचा कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४) वाघ व बिबट्यांच्या संवर्धन/ संरक्षणार्थ खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- नागपूर जिल्हयातील पेंच व्याघ्र प्रकल्पातील वन अधिकारी/कर्मचारी यांचे वाघ व वन्यप्राण्यांच्या संरक्षणाकडे विशेष लक्ष आहे. वाघ व वन्यप्राण्यांची भ्रमंती संरक्षित क्षेत्राबाहेर होऊ नये व संरक्षित क्षेत्रातच अधिवास रहावा यासाठी प्रत्येक नियतक्षेत्रामध्ये एक वनरक्षक व एक मदतनीस सज्ज आहे.
- पेंच व्याघ्र प्रकल्पातील संरक्षित क्षेत्रात ठिकठिकाणी ८२ संरक्षण कुटया उभारण्यात आल्या असून तेथे २४ तास मनुष्यबळ तैनात ठेवण्यात आले असून ते सर्व साहित्य व बिनतारी संदेश यंत्रणेने सज्ज आहेत.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलांची (STPF) स्थापना करण्यात आली आहे.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलाकडून नियमितपणे गस्त घालण्यात येते.
- वाघ व वन्यप्राण्यांचा संरक्षित क्षेत्रातच मुबलक पाणी व गवत कुरण मिळावे म्हणून बोरवेल, खोदतळे, वनतळे, भुमीगत बंधारे निर्माण करण्यात आलेले आहे. तसेच कुरण विकासाची कामे करण्यात आलेली आहे.
- वन्यप्राण्यांच्या हालचालींचे संनियंत्रण ठेवण्याकरीता कॅमेरा ट्रॅप, जीपीएसचा वापर केला जातो.
- शिकाऱ्याबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यात येते.
- वनसंरक्षणात लोकांचा सहभाग वाढवा म्हणून वनालगत असलेल्या गावांमध्ये ग्रामस्थांची वनसंरक्षण समितीची स्थापना करण्यात आली असून त्यांची संरक्षणांच्या कामात मदत घेण्यात येते.

- नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आले असून त्यांचेद्वारे नियमितपणे रेल्वे स्टेशन/ बस स्टँड/ आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांच्या अवैध व्यापार, वाहतूक याचा शोध घेण्यात येतो.
- वनक्षेत्रांमधून जाणाऱ्या विद्युत लाईनवर नियमितपणे गस्त करण्यात येते. तसेच विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेशी नियमितपणे संपर्क ठेवला जातो व संबंधित सबस्टेशनचे कार्यक्षेत्रात विद्युतप्रवाह खंडीत झाल्यास त्यांची माहिती घेवून विद्युतप्रवाहाद्वारे वन्यप्राण्यांच्या शिकारीचा प्रयत्न झाला किंवा कसे याची शहानिशा करण्यात येते.
- वनकर्मचाऱ्यामार्फत वनक्षेत्रात रात्र/ दिवस नियमितपणे तसेच पावसाळी विशेष गस्त घालण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर-नांदुर मध्यमेश्वर (जि.औरंगाबाद) येथे जमीन संपादन व पुलाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५२) * ३३२३१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर-नांदुर मध्यमेश्वर प्रकल्प विभाग क्र. २ वैजापूर मुख्यालय, औरंगाबाद अंतर्गत जमीन संपादन व पुलाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत शेतकऱ्यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदुर मध्यमेश्वर प्रकल्प विभाग क्र. २ या विभागाने बांधलेल्या तीन पुलापैकी १ पुल वाहून गेला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) नांदूर मध्यमेश्वर प्रकल्प विभाग क्र.२ या विभागाने राजापूर परिसरातील बांधलेल्या पुलांपैकी राजापूर-काठोडा रस्त्यावरील बांधकामाधीन कापसी नाला पुलाचा काही भाग अतिवृष्टीतील पुराच्या पाण्यामुळे क्षतीग्रस्त झालेला असून पुलाच्या बाजूचा नदीतटाचा भाग वाहून गेला आहे.

(३) सदर क्षतीग्रस्त पुलाची स्थळपाहणी संबंधित उप अभियंता यांनी केली असून पुलाचा क्षतीग्रस्त भाग पूर्ववत करून घेण्याचे तसेच पुलाची लांबी वाढविण्याचे काम नियोजित असून त्या भागात बॉक्स सेल पध्दतीच्या पुलाच्या कामाचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. सदरहू काम निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरगा तालुक्यात (जि.उस्मानाबाद) उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता, सरपंच, ग्रामसेवक यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(५३) * ३३७०० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि ग्रामपंचायतीच्या १३ व्या व १४ व्या वित्त आयोगाचा निधी एकाच कामावर खर्च झाल्याचे दाखवून वारंवार देयके वटविल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता, सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमताने शासनाचा कोटयवधी निधीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांमध्ये पत्रे, फरशी, दरवाजे, खिडक्या न बदलता छोटी कामे करुन एकाच कामाची दोनदा देयके काढून कोट्यवधी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग, उमरगा यांनी केलेल्या चौकशीनुसार त्रिकोळी व गुंजाटीवाडी या दोन्ही शाळांची दुरुस्तीची कामे सन २०१६-१७ मधील जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधून मंजूर असून सदर कामांची दुबार देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) जंगलामध्ये बांबूची तोड झाल्याबाबत

**(५४) * ३११३७ श्री.नारायण राणे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) तिलारी धरण क्षेत्राच्या बुडीत क्षेत्राला लागून असलेल्या वनखात्याच्या राखीव जंगलामध्ये मोठया प्रमाणात बांबूची तोड करुन वेताचे साठे जंगलात लपवून ठेवल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोनाळ वन विभागाकडून कुठल्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने सदर प्रकाराची वन खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी वन कर्मचाऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वनसंपदा जोपासण्यासाठी बाबूंची तोड करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबत

**(५५) * ३२०७९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७४१३ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार, पार, औरंगा, अंबिका या पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याच्या योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषणाच्या रुपये ३६३ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, पार, तापी, नर्मदा नदीजोड प्रकल्पाऐवजी नार, पार, औरंगा, अंबिका या पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविणे संबंधिच्या योजनेच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, तुटीच्या गिरणा खोऱ्यातील सततचा दुष्काळ व तीव्र पाणी टंचाईच्या पार्श्वभुमीवर प्रस्तुत योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) रुपये ३६३ लक्ष किंमतीच्या सर्वेक्षण व अन्वेषण कामाच्या अंदाजपत्रकास शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) नाही, सदर काम प्रगतीत आहे.

(३) नार-पार-औरंगा-अंबिका-गिरणा उपसा जोड सिंचन योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम करण्यासाठी वॅपकॉस लिमिटेड, दिल्ली (भारत सरकार उपक्रम) यांचेशी दिनांक ०८/१२/२०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार सदर सर्वेक्षण व अन्वेषण करावयाच्या कामाची रक्कम रुपये ३२६.४२ लक्ष इतकी अंतिम करण्यात आली असून सदर काम प्रगतीत आहे.

(४) सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम नोव्हेंबर, २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वसंतराव नाईक महामंडळात कर्जवाटप करताना अनियमितता झाल्याबाबत

**(५६) * ३३१६१ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री पुढील** गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वसंतराव नाईक महामंडळात लाभार्थ्यांना कर्जवाटप करताना अनियमितता झाल्याचे महालेखा परिक्षकांनी दिलेल्या अहवालात नमूद करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) महालेखापाल कार्यालयाच्या लेखापरिक्षणामध्ये वसंतराव नाईक महामंडळाच्या औरंगाबाद व ठाणे जिल्ह्यांतील कार्यालयामार्फत कर्ज वितरणामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) वसंतराव नाईक महामंडळाच्या ठाणे व औरंगाबाद येथील जिल्हा व्यवस्थापकांकडून अनियमितता झालेल्या प्रकरणांची छाननी करुन पुढील कार्यवाही महामंडळ स्तरावर करण्यात येत आहे.

ठाणे जिल्हा कार्यालयातील ८ लाभार्थ्यांच्या कर्जवितरणामध्ये अनियमितता आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द ठाणे नगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खिंडवाडी (ता.महाड, जि.रायगड) धरणातील गाळ काढण्याबाबत

**(५७) * ३३३९१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) मधील फौजी आंबवडे, शिरवलीसह २५ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या खिंडवाडी धरणातील गाळ मागील बरेच वर्षापासून काढण्यात आलेला नसल्यामुळे सदर धरण चिखलगाळात रूतले असून भविष्यात खिंडवाडी धरण इतिहास जमा होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड तालुक्यातील फौजी आंबवडे, शिरवली, महाडीकोंड, रोहिदासवाडी आदी २५ गावांना पाण्याची टंचाई भासू नये म्हणून लघुपाटबंधारे विभागाने १९७५ मध्ये खिंडवाडी गावठाणाजवळ धरण बांधले असून पाटबंधारे विभागाने सदर धरणातील गाळ न काढल्याने धरणात गाळ जमा झाल्याने सदर २५ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खिंडवाडी धरणातील साचलेला गाळ काढून पाण्याचा नियमित व सुरळीत पुरवठा होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही. गेल्या पाच वर्षात सरासरी २.१३६ द.ल.घ.मी. पाणी साठा झाला आहे.

(२) हे खरे नाही. खिंडवाडी योजनेच्या प्रकल्पीय अहवालानुसार १५८ हे. क्षेत्र सिंचनासाठी येणे अपेक्षित आहे. परंतु सिंचनासाठी शेतकऱ्यांची मागणी नसल्याने प्रकल्पामध्ये शिल्लक राहिलेले पाणी हे प्रकल्पाच्या खालील बाजूस असलेल्या १३ गावांच्या पिण्याच्या पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांना मागणीप्रमाणे धरणातून पाणी सोडण्यात येते.

(३) शा.नि.क्र. लाक्षेवि-२०१७/प्र.क्र.६७/१७/लाक्षेवि (आस्था) दिनांक २४ मे, २०१७ नुसार लघु पाटबंधारे तलाव व मध्यम प्रकल्पातील गाळ काढण्याचा धोरणात्मक निर्णय घेणेत आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण सोलापूर (ता.जि.सोलापूर) येथे पंडीत दीनदयाळ योजना राबविण्याबाबत

**(५८) * ३४२२७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर (ता.जि.सोलापूर) येथे पंडीत दीनदयाळ जागा खरेदी योजना राबविण्यात प्रशासनाला अपयश येत असल्याचे दिनांक ९ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंदिरा आवास, प्रधानमंत्री आवास, रमाई, शबरी, पारधी, पंडित दिनदयाळ इत्यादी घरकुल योजनेंतर्गत घर घेण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय किंवा सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना पन्नास हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे, परंतु या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याकरिता शासन योजना राबवित नसल्याने लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोमवारपेठ (जि. नागपूर) विमा रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ व सहाय्यकांची नियुक्ती करण्याबाबत

**(५९) * ३३४०३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सोमवार पेठेतील विमा रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) तसेच इतर विभागातील डॉक्टर सकाळी उशिरा येत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात तपासणीकरीता रक्त काढण्याचे काम सफाई कर्मचारी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे गरीब रुग्णाची गैरसोय होत असून त्याबाबतची तक्रार नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

तथापि, संबंधित कर्मचाऱ्यांना रक्ताचे नमूने काढण्याचे आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) डॉक्टर्ससह इतर सर्व कर्मचारी रुग्णालयात वेळेवर उपस्थित राहावे याकरीता बायोमेट्रीक सिस्टीम बसविण्यात आली असून समवैद्यकीय संवर्गातील पदे भरण्याबाबत शासन उपक्रमीत मे.महाऑनलाईन लि. मार्फत समवैद्यकीय संवर्गातील सर्व पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दूरचित्रवाणीवरील जाहिरातीमधून स्त्रियांचे होणारे शरीर प्रदर्शन थांबविण्याबाबत

**(६०) * ३२७७२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाढी करण्याच्या रेझरपासून मोटारींच्या टायर आणि कपड्यांपर्यंतच्या सर्व जाहिरातींमध्ये महिलांचे शरीर प्रदर्शन करणाऱ्या तसेच पॉर्नस्टार सनी लिऑनची एक आक्षेपार्ह जाहिरात सध्या टेलिव्हीजनवर सातत्याने झळकत असून या जाहिरातीच्या निमित्ताने महिला संघटनांनी आक्षेपार्ह जाहिरातीवर बंदी आणण्याच्यादृष्टीने राज्य महिला आयोगाकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जाहिरातीतील महिलांचे शरीर प्रदर्शन रोखण्याकरिता कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दूरचित्रवाणी वाहिन्यांवर तसेच केबल नेटवर्कव्दारे प्रसारित होणाऱ्या अश्लील, हिंसाचारी चित्रपट, प्रसारण, जाहिराती इ. वर बंदी घालण्यासाठी केंद्र सरकारने केबल टेलिव्हीजन नेटवर्क (रेग्युलेशन) ॲक्ट, १९९५ पारित केला असून त्यानुसार कार्यक्रम संहिता व जाहिरात संहिता लागू करण्यात आली आहे. सदर कायद्यामधील तरतुदींचे पालन योग्यरितीने होत आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी राज्य व जिल्हास्तरीय खाजगी दूरचित्रवाणी वाहिनी संनियंत्रण समित्यांच्या स्थापनेबाबतची कार्यवाही सुरु असून सदर कायद्याच्या कलम १९ अन्वये संबंधित केबल चालकाला असे कार्यक्रम प्रसारित करण्याबाबत बंदी घालण्यासाठी महासंचालक (माहिती व जनसंपर्क) यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने त्यांच्या दिनांक १७/०७/२०१७ च्या पत्रान्वये उपरोक्त प्राप्त निवेदन केंद्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील निमशासकीय कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्याबाबत

**(६१) * ३३४५० श्री.विक्रम काळे : दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक १२४६५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय राज्यातील निमशासकीय संस्था (कार्यालये) व शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांना व निमशासकीय कर्मचाऱ्यांना अपघात विमा योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रस्तावावर तपासणी करुन सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मौजे कुसूर व मौजे मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) येथील संपादित जमिनीच्या नुकसान भरपाईच्या रकमा अदा करण्याबाबत

**(६२) * ३१४३९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १९३७८ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुसूर (ता.येवला, जि.नाशिक) येथील संपादित जमिनीच्या वाढीव नुकसान भरपाईच्या प्रलंबित रकमा अदा करण्यासाठी सन २०१३-१४ मधील रुपये ११२.१४ च्या अखर्चित निधीस या आर्थिक वर्षात खर्च करण्यास परवानगी मिळणेबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने शासनास प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महालेखापालांची सहमती घेण्यासाठी सदर प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नांदुर मध्यमेश्वर जलद कालव्यासाठी संपादीत झालेल्या मौजे मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींच्या नुकसान भरपाईची रुपये ६९७.२४ लक्ष रक्कम शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रलंबित रकमा शेतकऱ्यांना अदा करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक १९/१/२०१७ अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम १८ नुसार करावयाच्या वाढीव मोबदल्याच्या प्रदानासाठी रुपये ४२.१४ लक्ष इतक्या रकमेस शासन पत्र क्र. बीजीएम १०.१६/(३२/२०१६)/अर्थ-१, दिनांक ३०/०१/२०१७ अन्वये मंजुरी दिली असून सदरहू रक्कम महामंडळास वितरीत करण्यात आली आहे.

(२) नाही.

(३) नांदुर मध्यमेश्वर जलद कालव्यासाठी संपादित जमिनीकरीता वाढीव नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भात मौजे मुखेड (ता.येवला, जि.नाशिक) येथील ४३ भूसंदर्भ प्रकरणे असून, सदर प्रकरणात मा.निफाड न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने कायदे विषयक सल्ल्यानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपील दाखल करण्यात आले आहे. यापैकी १२ प्रकरणात संपूर्ण रक्कम सहा आठवडयात भरण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २१/०१/२०१५ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी दिले आहेत. तसेच उर्वरित ३० प्रकरणात मा.दिवाणी न्यायालयाचे जप्ती आदेश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार महामंडळाने सदर ४२ प्रकरणात एकूण रुपये ७०५.९५ लक्ष निधी उपलब्ध करुन दिला असून आयकर रुपये ५६.३५ लक्ष वजा जाता निव्वळ रक्कम रुपये ६४९.६० लक्ष मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, निफाड येथे जमा केलेली आहे.

एलएआर क्र. २६/०४ या एका प्रकरणात मा.न्यायालयाने कोणतेही आदेश न दिल्याने निधीची मागणी केलेली नाही.

(४) होय.

(५) सन २०१७-२०१८ मध्ये नांदुर मध्यमेश्वर प्रकल्पास रुपये २७.०० कोटी तरतूद मंजूर आली असून सदर निधी महामंडळास माहे एप्रिल, २०१७ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

त्यानुसार उक्त प्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे परिगणना करुन ४२ भूसंदर्भ प्रकरणात महामंडळाने रुपये ७०५.९५ लक्ष प्रदान केले असून नियमाप्रमाणे रुपये ५६.३५ लक्ष आयकर वजा जाता रुपये ६४९.६० लक्ष मा.दिवाणी न्यायालय, निफाड येथे जमा करण्यात आले आहेत.

-----------------

## नागपूर जिल्हयातील उमरेड कऱ्हांडला अभयारण्याच्या सीमेलगतच्या गावात वन्यप्राण्यांनी पिकांचे नुकसान केल्याबाबत

**(६३) * ३१७७६ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील उमरेड कऱ्हांडला अभयारण्याच्या सीमेलगतच्या तारणा, विरखंडी, हरदोली, पंचखेडी, चिकना, धामना, ढाणा, रानबोडी, देणी, कऱ्हांडला, दहेगाव, वेळगांव व इतर गावातील वन्यप्राण्यांनी शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान केल्याने सन २०१४ मध्ये वनविभागाकडे नुकसान भरपाई मिळण्याबाबत शेतकऱ्यांनी तक्रार दाखल करूनही अद्यापही सदर परिसरातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात फक्त कुही वन्यजीव वनपरिक्षेत्रात रानबोडी हे गाव येते. तारणा, विरखंडी, हरदोली, पंचखेडी, चिकना, धामना, ढाणा, रानबोडी, देणी, दहेगाव, वेळगांव ही गावे उमरेड कऱ्हांडला अभयारण्याच्या सीमेलगतची गावे आहेत.

सन २०१४ मध्ये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत उत्तर उमरेड व दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रात अनुक्रमे ७४ व १८३ प्रकरणे प्राप्त झाली आहेत. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने प्रचलित शासन निर्णयानुसार उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रात पीक नुकसानाच्या अनुषंगाने रुपये ६.१६ लक्ष तर दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रात रुपये ८.१ लक्ष व कुही वन्यजीव वनपरिक्षेत्रात रुपये १.४८ लक्ष इतकी नुकसान भरपाई संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास अदा करण्यात आली आहे.

(२) वनविभागास प्राप्त होत असलेल्या प्रकरणाबाबत प्रचलित धोरणानुसार नुकसान भरपाईकरिता पात्र असलेल्या प्रकरणी संबंधितास नुकसान भरपाई अदा केली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यात बालकांचा मृत्यू झाल्याबाबत

**(६४) * ३३३७८ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात माहे एप्रिल-मे, २०१७ या दोन महिन्यात हृदयविकार, ताप, डायरिया व अज्ञात दुर्धर आजारामुळे कमी वजनाच्या व मुदतीपूर्व जन्मलेल्या २८ बालकांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

डहाणू तालुक्यात माहे एप्रिल-मे, २०१७ या दोन महिन्यात झालेल्या २८ बालमृत्यूंपैकी ॲसपेक्शियामुळे ६, हृदयाच्या आजारामुळे ४, अपघात व कमी वजनामुळे प्रत्येकी ३, सेपटीसेमीया व मुदतीपूर्व जन्मलेल्यामुळे प्रत्येकी २ अशा एकुण २० बालकांचा मृत्यू झालेला असुन इतर कारणांमुळे ८ बालकांचा मृत्यू झालेला आहे.

(२) दरमहा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बालमृत्यू अन्वेषण सभा घेण्यात येते. सदर सभेत झालेल्या बालमृत्यूचे अन्वेषण करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या मजुरांचा मृत्यू झाल्याबाबत

**(६५) * ३११४६ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या ११ मजुरांचा वन विभागाच्या चुकीमुळे अपघात होवून मृत्यू झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेंदूपत्ता कंत्राटदाराने सदर मजुरांना जंगलात नेण्यासाठी वनविभागाचे वाहन घेतले होते, सदर वाहनातील वाहनचालकाने मद्यप्राशन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मृत्यू झालेले व अपघातात गंभीर जखमी झालेल्या मजुरांच्या वारसाला आर्थिक मदत देवून शासकीय नोकरीत सामावून घेण्यासाठी तसेच त्यांच्या उपचारासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर अपघातास कारणीभूत असलेल्या दोषींवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) जिल्हाधिकारी, गोंदिया तसेच वनसंरक्षक, वनमंडळ, जबलपूर, मध्यप्रदेश यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मध्यप्रदेश राज्यातील जबलपूर जिल्हयात तेंदू पाने संकलनाकरीता आलेले ११ मजूरांचा मृत्यू दिनांक १०/११ मे, २०१७ च्या मध्यरात्री वाहन दुर्घटनेमध्ये झाला आहे. सदर घटनेत १५ मजूर जखमी झाले आहेत. सदर घटनेसंदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, जबलपूर यांनी त्यांचे ११ मे, २०१७ चे आदेशानुसार न्यायिक चौकशी आदेशित केली आहे. सदर घटनेशी महाराष्ट्र वनविभागाचा कोणताही संबंध नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी, जिल्हाधिकारी, जबलपूर यांनी ११ मे, २०१७ चे आदेशान्वये न्यायिक चौकशी आदेशित केली आहे.

(३) वनसंरक्षक, जबलपूर, मध्यप्रदेश यांचे अहवालानुसार मृत मजूरांच्या वारसदारांना मध्यप्रदेश शासनाचे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रुपये १ लाख तसेच गंभीर जखमीना प्रत्येकी रुपये २५ हजार इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले आहे. जखमी व्यक्तीचा उपचार जबलपूर मेडीकल कॉलेज मध्ये नि:शुल्क करण्यात आला आहे.

(४) उक्त दुर्घटनेसंदर्भात जिल्हाधिकारी, जबलपूर, मध्यप्रदेश यांनी न्यायिक चौकशी आदेशित केली आहे. तसेच मध्यप्रदेश वनविभागाने केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारावर एक उपवनक्षेत्रपाल आणि एक वनरक्षक यांना निलंबित करुन त्यांचेवर दोषारोपपत्र बजावले आहे. तसेच संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैतरणा नदीपात्रातील पाणी अडविण्यासाठी बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत

**(६६) * ३११८९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा नदीच्या पात्रातील पाणी अडविण्यासाठी गेल्या १० वर्षात या परिसरात शासनाकडून लाखो रुपये खर्च करुन पाचहून अधिक बंधारे बांधण्यात आलेले असून हे बंधारे उद्‌घाटनाच्या दिवसांपासून नादुरुस्त असल्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील संपूर्ण नदीच कोरडी पडल्याने येथील शेकडो शेतकऱ्यांच्या भाजीपाला व अन्य पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यासंदर्भात वारंवार तक्रारी करुनही अधिकारी लक्ष देत नाहीत त्यामुळे गोऱ्हा, परिसरातील नाने, गालतरे, सावरे पाचधारा, सांगे, आवंढे, ऐंबुर, गुहीर व घोडमाळ येथील नदीकाठावरील गावातील शेतकऱ्यांनी कोरड्या पडलेल्या वैतरणा नदीच्या पात्रात दिनांक २८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, हे अंशतः खरे आहे.

सन २००२-०३ मध्ये वाडा तालुक्यातील मौजे गुहीर येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे. सदर बंधाऱ्यातील पाणीसाठ्याचा लाभ नाने, गालतरे, गुहीर, सावरे, सांगे, आवंढे, ऐंबुर व घोडमाळ या परिसरातील शेतकऱ्यांना होतो. सदर बंधाऱ्याचे स्थापत्य काम सुस्थितीत आहे, मात्र लोखंडी बर्गे गंजून निकामी झाल्यामुळे बंधाऱ्यातून पाणी गळती होते व बंधाऱ्यातील पाणी लवकर आटते. त्यामुळे मे, २०१७ मध्ये वैतरणा नदीचे पात्र कोरडे पडत चालले होते.

यामुळे गुहीर को.प. बंधाऱ्याला बर्गे पुरविणे व सिल लेव्हलला चॅनेल बसविणे या दुरूस्ती कामांसाठी प्रश्नांकित गावातील शेतकऱ्यांनी कोरडया पडलेल्या वैतरणा नदीपात्रात दिनांक २८ मे, २०१७ रोजी मोर्चा काढला होता.
(४) जिल्हा परिषद, पालघर यांचे दिनांक २७/०४/२०१७ रोजीच्या कार्यारंभ आदेशान्वये प्रस्तुत बंधाऱ्याच्या दुरूस्ती कामास मंजुरी देण्यात आली आहे. जुने व नव्याने बसविण्यात येणाऱ्या बर्गेच्या सहाय्याने सन २०१७ च्या ऑक्टोबर महिन्यापासुन सन २०१८ च्या पावसाळयापर्यंत पाणीसाठा करण्याचे नियोजन याव्दारे करण्यात आलेले आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना भविष्यात पाणी टंचाई जाणवणार नाही अथवा भाजीपाला/ अन्य पिकांचे नुकसान होणार नाही याबाबतचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साईधाम नगर चारकोप, कांदिवली (मुंबई) येथील खारफुटीची तोड केल्याबाबत

**(६७) * ३४०१७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साईधाम नगर चारकोप, कांदिवली (मुंबई) येथील खारफुटींची प्रचंड तोड करुन झोपड्यावजा घरे उभारण्यात येत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जागा ही वन खात्याची असूनही उभारलेल्या अनधिकृत घरांकरिता म्हाडाच्या माध्यमातून फोटोपास वाटण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत अन्याय निवारण, भ्रष्टाचार निर्मुलन व पर्यावरण संरक्षण संस्थेने गुगल इमेजचा वापर करुन खारफुटींची प्रचंड तोड होत असल्याबाबत तक्रार वनाधिकाऱ्यांकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदरहू ठिकाणी बांधण्यात आलेली अनधिकृत झोपडीवजा घरे त्वरीत निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) कांदिवली येथील राखीव वन सर्व्हे नं. १४९ चे क्षेत्र २६.५६ हे.आर असून त्यापैकी ०.७ हे.आर क्षेत्रावर ४९३ अनधिकृत झोपड्या होत्या. सदरचे अतिक्रमण, प्रश्नांकित क्षेत्र सन २०१३ मध्ये कांदळवन कक्षाकडे हस्तांतरित होण्यापूर्वीचे होते. यासंदर्भात दिनांक १९/९/२०१६ रोजी वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(२) सदरचे क्षेत्र सन २०१३ पूर्वी म्हाडाच्या ताब्यात असल्याने शासनाच्या तत्कालीन धोरणानुसार त्यावेळी ४१७ झोपडीधारकांना म्हाडामार्फत फोटोपास वितरित करण्यात आले होते. परंतू सदरचे क्षेत्र वनखात्याकडे वर्ग झाल्यानंतर फोटोपास देण्यात आलेले नाहीत.
(३) अन्याय निवारण, भ्रष्टाचार निर्मुलन व पर्यावरण संरक्षण संस्था यांनी साईधामनगर, चारकोप कांदिवली येथील अतिक्रमणासंबंधात दिनांक १०/३/२०१७ रोजी कांदळवन कक्षास तक्रार केली आहे.
(४) सदर तक्रारीबाबत चौकशी करुन दिनांक २४/४/२०१७ रोजी सदर वनक्षेत्रावरील ३० व्यापारी गाळे व १८६ रहिवाशी झोपड्या असे एकूण २१६ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली आहेत. उर्वरीत २७७ अतिक्रमकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये नोटीस देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात गर्भलिंग निदान परीक्षण साहित्याची ऑनलाईन विक्री सुरु असल्याबाबत

**(६८) * ३२२६४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गर्भलिंग निदानासाठी बंदी असलेल्या परीक्षण साहित्याची इंटरनेटच्या माध्यमातून ॲमेझॉन वेबसाईटवर ऑनलाईन विक्री सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून राज्यात ऑनलाईन गर्भलिंग निदानाच्या किट्सच्या विक्रीवर बंदी आणून सदर विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) याबाबत वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) सदर प्रकरणी तपासणी करण्यात येईल.

-----------------

## स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील (ता.अंबेजोगाई, जि.बीड) मोफत औषध पुरवठा निधी परत गेल्याबाबत

**(६९) * ३३२३५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील (ता.अंबेजोगाई, जि.बीड) रूग्णांना मोफत औषधी देण्यासाठी देण्यात आलेला दोन कोटी रूपयांचा औषध खरेदीचा निधी दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास परत गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने रूग्णांना मोफत औषधी पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई या संस्थेकडून (२१) सामुग्री व पुरवठा या उद्दिष्टांतर्गत वित्तीय वर्ष सन २०१६-१७ करीता मंजूर अनुदानापैकी रुपये १,०५,५९,०००/- इतका निधी समर्पित करण्यात आला आहे. तथापि, रुग्णांना गरजेनुसार वेळेवर औषधांचा पुरवठा झालेला आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे.

-----------------

## परंडा तालुक्यात (जि.उस्मानाबाद) अत्यल्प अनुदानामुळे शेततळ्यांची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(७०) * ३३७७४ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परंडा तालुक्यात (जि.उस्मानाबाद) ४५५ शेततळयांचे उद्दिष्ट असताना अत्यल्प अनुदानामुळे शेतकऱ्यांना शेततळयांची कामे पूर्ण करण्यास अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १४९ शेततळ्यांची कामे पूर्ण तर १५४ शेततळ्यांची कामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेततळ्यांच्या कामाकरिता अत्यल्प अनुदान देण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन तात्काळ अनुदान वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाच्या मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एकूण ३७०० शेततळयांचे उद्दिष्ट असून परंडा तालुक्यासाठी ४५५ शेततळयांचे उद्दिष्ट आहे. सध्या परंडा तालुक्यामध्ये शेततळ्यांची ३१४ कामे पूर्ण केली असून ३२ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) शासन निर्णय दिनांक १७/२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मागेल त्याला शेततळे ही योजना मंजुर करण्यात आली आहे. सदर योजना अनुदान स्वरुपातील आहे. मागेल त्याला शेततळ्यांच्या योजनेंतर्गत शेततळ्याच्या आकारमानानुसार कमाल रुपये ५०,००० इतके अनुदान अनुज्ञेय आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामीण भागातील रुग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(७१) * ३१२७१ श्री.नारायण राणे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्रय रेषेखालील नागरिकांना वैद्यकीय सेवेचा लाभ घेता यावा या उद्देशाने सुरु करण्यात आलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना शहर आणि मध्यमवर्गीयांपुरतीच मर्यादित असल्याचा निष्कर्ष सेहत संस्थेने जाहीर केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: बीड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सिंधुदूर्ग आणि वाशिम या जिल्हयांमध्ये सर्वात कमी रुग्णालयांमध्ये ही योजना उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्नपूर्णा व अंत्योदय कार्डधारक लाभार्थीचे प्रमाण अत्यंत नगण्य असून खर्चिक असणाऱ्या कर्करोगाच्या उपचार पध्दतीचा १५ हून अधिक जिल्हयांमध्ये या योजनेचा अभाव आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ ग्रामीण भागातील रुग्णांना मिळण्यासाठी सदर योजना गाव, खेडी येथे पूर्णक्षमतेने राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) सेहत या संस्थेमार्फत जुलै, २०१२ ते ऑगस्ट, २०१४ या कालावधीतील सदर योजनेचा सर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध केला आहे. सदर अहवालानुसार ग्रामीण भागातील रूग्णांना शहरी भागातील रूग्णालयात जावे लागते. तथापि, या कालावधीत ग्रामीण भागात १,८१,९२४ तर शहरी भागातील १,०५,५९३ अशा एकूण २,८७,५१७ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.
(२) बीड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, नंदुरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग आणि वाशिम या जिल्हयांमध्ये एकूण ८९४ अंगीकृत रूग्णालयांपैकी ६३ रूग्णालये अंगीकृत आहेत.
(३) दिनांक १ जुलै, २०१२ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१४ या कालावधीत ७०१४१ अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक व २४७३१४० अंत्योदय शिधापत्रिकाधारक असे एकूण २५,४३,२८१ शिधापत्रिकाधारक लाभार्थी होते. हे प्रमाण एकूण लाभार्थ्यांच्या ११.५१ टक्के आहे. दिनांक १ जुलै, २०१२ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१४ पर्यत या गटातील एकूण ४८२७ लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे. राज्यात १४६ रूग्णालये कर्करोगासाठी अंगीकृत आहेत. ज्या जिल्ह्यामध्ये कर्करोगासाठी अंगीकृत रूग्णालय नाही, त्या जिल्ह्यामधील रूग्णांनी जवळच्या जिल्हयातील अंगीकृत रूग्णालयात उपचार घेतले आहेत.

(४) या योजनेंतर्गत अंगीकृत रूग्णालयांनी ११०४६ आरोग्य शिबीरे घेतली असून त्यामधून तसेच रेडीओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, रेल्वे व एस.टी.बस या माध्यमातून योजनेचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्वतंत्र स्त्री रुग्णालयास मंजूरी देण्याबाबत

**(७२) * ३२०९६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७२९२ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील मंजूर १५ स्त्री रुग्णालयांपैकी उर्वरित ७ स्त्री रुग्णालयासाठी जागेचे संपादन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच १०० खाटांचे स्वतंत्र महिला व नवजात शिशू रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, महिला रुग्णालय, धुळे येथे आकृतीबंधानुसार पद निर्मिती करण्याबाबतच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

मंजूर १०० खाटांचे १५ स्त्री रुग्णालयापैकी १२ स्त्री रुग्णालयास जागा प्राप्त करुन घेण्यात आली आहे, उर्वरित ३ स्त्री रुग्णालयासाठी जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) सदर १२ स्त्री रुग्णालयापैकी ४ स्त्री रुग्णालयाचे बांधकाम सुरु असून, ८ स्त्री रुग्णालये बांधकामाचे अंदाज आराखडे व प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे खरे आहे.

उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार शासन निर्णय दिनांक २ जानेवारी, २०१७ अन्वये एकूण ९७ पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.